'सिकल सेल' विकाराविषयी व्यापक जागृती आवश्यक

पुणे : 'सिकल सेल' हा रक्तातील लाल रक्तपेशींचा विकार आहे. भारतातील त्याच्या लक्षणीय प्रमाणामुळे आरोग्य क्षेत्रापुढील ते एक आव्हान आहे. या विकाराच्या रुग्णसंख्येबाबत जगात नायजेरियानंतर भारताचा क्रमांक लागतो. दुर्गम भागात वैद्यकीय सुविधांच्या अभावामुळे व अज्ञानामुळे या विकाराची वेळीच तपासणी, निदान व उपचार करणे अडचणीचे ठरते, अशी माहिती 'नॅशनल अलायन्स ऑफ सिकल सेल ऑर्गनायझेन्स'चे सचिव गौतम डोंगरे यांनी दिली.

त्यांनी सांगितले, की या विकाराचे निदान होऊन, त्याविषयी संबंधितांना लवकर माहिती देण्याची गरज आहे. 'सिकल सेल'च्या लक्षणांवरून इतर रक्तविकार असल्याचे चुकीचे निदान होण्याची शक्यता अधिक असते. त्यात लाल रक्तपेशींचा आकार अर्धवक्राकार होऊन, त्या अल्पजीवी व ठिसूळ होतात. ग्रामीणसह शहरी भागांतही या विकाराविषयी व्यापक अनभिज्ञता आहे. त्यामुळे अचूक उपचारांना विलंब होतो.

या विकारावर सामान्यतः 'हाइड्रोक्सीयूरिया' हे औषध वापरले जाते. त्यामुळे रुग्णांची वेदना बऱ्याच प्रमाणात सौम्य होते. काही रुग्णांना रुग्णालयात दाखल होऊन रक्त संक्रमण (ब्लड ट्रान्सफ्यूजन) करून घ्यावे लागते. स्टेम सेल प्रत्यारोपणाने या विकारावर बऱ्याच प्रमाणावर मात मिळवता येते. परंतु या सर्व उपचारांमागे काही आव्हाने, अडचणी असतातच. त्यामुळे सध्याच्या उपचारांतील आव्हानांवर मात करण्यासाठी या विकाराला नीट समजून घेणे, नवनवीन उपाय शोधणे हाच पर्याय आहे. सध्या तरी लवकरात लवकर निदान व उपचार हे या विकाराच्या व्यवस्थापनासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. भारतात सुमारे एक कोटी ८० लाख जणांत या विकाराची लक्षणे असून, १४ लाख या विकाराचे रुग्ण आहेत. हे रुग्ण मोठ्या प्रमाणात असलेल्या १४ राज्यांत महाराष्ट्राचा समावेश होतो.

विदर्भ, सातपुड्यातील आदिवासी भाग व मराठवाड्यातील काही जिल्ह्यांत याचा जास्त प्रमाणात प्रादुर्भाव आढळतो. महाराष्ट्रासह छत्तीसगड, पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, झारखंड, गुजरात, ओडिशा, केरळ व राजस्थानात या विकाराचे रुग्ण मोठ्या प्रमाणात आढळत असल्याने हा 'सिकल सेल पट्टा' म्हणून ओळखला जातो. या विकाराच्या व्यवस्थापनासाठी सर्वंकष काळजी घेणे गरजेचे असते. वेळेवर निदान-अचूक उपचारांसाठी विवाहपूर्व, प्रसवपूर्व आणि नवजात अर्भकांची त्या दृष्टीने तपासणी व प्रौढ रुग्णांचे 'न्युमोकोकल' लसीकरण करणे गरजेचे असते.

प्रारंभी अयोग्य वाटणारे अनेक निर्णय राष्ट्रासाठी लाभदायक- पंतप्रधान मोदी

बंगळूरु : 'अग्निपथ' योजनेविरोधात देशभर असंतोष व्यक्त केला जात असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी त्याचा थेट उल्लेख टाळून सूचक वक्तव्य केले. ''अनेक निर्णय प्रारंभी अयोग्य वाटू शकतात, परंतु नंतर मात्र ते राष्ट्रउभारणीत साहाय्यभूत ठरतात,'' असे पंतप्रधान म्हणाले.

पंतप्रधान मोदी यांनी बंगळूरु येथे भाषण केले. सुधारणांचा मार्ग आपल्याला नवे लक्ष्य आणि नवीन संकल्पाकडे घेऊन जाऊ शकतो. अनेक दशके सरकारी नियंत्रणाखाली असलेले अवकाश आणि संरक्षण क्षेत्र आम्ही मुक्त केले आहे. 'स्टार्टअप' आणि 'इनोव्हेशनचा मार्ग सुलभ नाही. गेल्या आठ वर्षांत देशाला या मार्गावर आणणेही सोपे नव्हते. अनेक निर्णय आणि सुधारणा आज अयोग्य वाटू शकतात, परंतु यथावकाश त्याचे फायदे देशाला मिळू शकतात, असे विधान मोदी यांनी केले. तथापि, त्यांनी आपल्या भाषणात अग्निपथ योजनेचा थेट उल्लेख मात्र केला नाही.

२१ व्या शतकातील भारत संपत्ती आणि रोजगार निर्माण करणारा, त्याचबरोबर नवोन्मेषकांचा आहे, तेच देशाची खरी शक्ती आहेत. केंद्र

सरकार गेल्या आठ वर्षांपासून त्यांना प्रोत्साहन देत असल्याचे मोदी यांनी नमूद केले.

मोदी यांच्या हस्ते अनेक विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन करण्यात आले. सुधारणांचा मार्ग आपल्याला नवे लक्ष्य आणि नवीन संकल्पाकडे घेऊन जाऊ शकतो. अनेक दशके सरकारी नियंत्रणाखाली असलेले अवकाश आणि संरक्षण क्षेत्र आम्ही मुक्त केले आहे, असेही मोदी म्हणाले.

ते म्हणाले, ''सरकारने सुविधा पुरवल्या आणि हस्तक्षेप कमी केला तर भारतीय तरुण काय करू शकतात, हे बंगळूरु शहराने दाखवून दिले आहे. बंगळूरु शहर युवकांसाठी स्वप्नांचे शहर आहे. त्यामागे उद्योजकता, नवोन्मेष आणि सरकारी आणि खासगी क्षेत्राचा योग्य उपयोग ही प्रमुख कारणे आहेत.''

> सुधारणांचा मार्ग आपल्याला नवे लक्ष्य आणि नव्या संकल्पाकडे घेऊन जाऊ शकतो. अनेक दशके सरकारी नियंत्रणाखाली असलेले अवकाश आणि संरक्षण क्षेत्र आम्ही मुक्त केले. – नरेंद्र मोदी, पंतप्रधान

'अग्निपथ'विरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका

नवी दिल्ली : केंद्राने नुकत्याच जाहीर केलेल्या लष्करभरतीच्या अग्निपथ योजनेविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका करण्यात आली आहे. सरकारने लष्करभरतीची एक शतकापासूनची पद्धत मोडीत काढून घटनात्मक तरतुदींचा भंग करून आणि संसदेच्या मंजुरीशिवाय नवी योजना जाहीर केल्याचा आरोप याचिकेत करण्यात आला आहे. ॲड्. एम. एल. शर्मा यांनी ही याचिका केली असून, योजनेबाबतचे सरकारचे परिपत्रक रद्द करण्याची मागणी केली आहे.

बँक ऑफ बड़ौदा Bank of Baroda
नॉर्थ अव्हेन्यू रोड पलं क्वॉन, नॉर्थ अव्हेन्यू रोड, सांताक्रूझ(पश्चिम), मुंबई -महाराष्ट्र ४०००५४ दूरध्वनी: ०२२-२६४९३५२० ई—मेल: vjsanw@bankofbaroda.com

ताबा सूचना

कर्जदार हे रकमेचा भरणा करू न शकल्यामुळे सूचना याद्वारे कर्जदार आणि सामान्य जनतेला देण्यात येत आहे की सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली, २००२ च्या नियम ८ सह वाचल्या जाणाऱ्या कायद्याच्या कलम १३ च्या पोट कलम (४) अंतर्गत त्यांना देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून १४ जून २०२२ रोजी ताबा घेतला आहे.
विशेषतः कर्जदार/ हमीदार/ गहाणदार आणि सर्व जनतेला याद्वारे सावध करण्यात येत आहे की मालमत्तेशी कोणताही व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी जर असा व्यवहार झाला असल्यास १४.०६.२०२२ अनुसार रु. ३२४९६२९.७४ (रुपये बत्तीस लक्ष एकूण पन्नास हजार सहाशे एकोणतीस आणि चौऱ्याहत्तर पैसे मात्र) आणि भरणा होई पर्यंतच्या त्यावरील करारामधील दराने व्याज, शुल्क, किंमत आणि खर्चाचा भरणा बँक ऑफ बडोदाकडे भरणा करण्यास पात्र असतील.
सुरक्षित मालमत्ता सोडविण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात कायद्याच्या कलम १३ चे पोट कलम (८) अंतर्गत असलेल्या तरतुदीकडे कर्जदारांचे लक्ष वेधून घेण्यात येत आहे.
(स्थावर मालमत्तेसाठी)
ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ चे प्राधिकृत अधिकारी आहेत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली, २००२ च्या नियम ३ सह वाचल्या जाणाऱ्या कायद्याच्या कलम १३ (१२) अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून कर्जदार आलिया अब्दुल शेख आणि कुमारी फातिमा अब्दुल शेख, सदनिका क्र. १२०२, १२ वा मजला, बी विंग, अगरवाल टॉवर मिलेनियम रेसिडन्सी सीएचएसएल, मंगलमूर्ती कॉम्प्लेक्स, मानखुर्द घाटकोपर लिंक रोड, मानखुर्द पश्चिम, मुंबई -४०००४३ यांना सूचनेमध्ये नमूद रक्कम १४.०६.२०२२ अनुसार रु. ३२४९६२९.७४ (रुपये बत्तीस लक्ष एकोणपन्नास हजार सहाशे एकोणतीस आणि चौऱ्याहत्तर पैसे मात्र) आणि भरणा होई पर्यंतच्या त्यावरील करारामधील दराने व्याज, शुल्क, किंमत आणि खर्चाचा भरणा नमूद सूचना प्राप्त झाल्यापासून ६० दिवसांच्या आत करण्यासाठी मागणी सूचना दिनांकित १२.०४.२०२२ रोजी जारी करण्यात आली होती.
स्थावर मालमत्तेचे वर्णन
सदनिका क्र. १२०२, १२ वा मजला, बी विंग, अगरवाल टॉवर मिलेनियम रेसिडन्सी सीएचएसएल, मंगलमूर्ती कॉम्प्लेक्स, मानखुर्द घाटकोपर लिंक रोड, मानखुर्द पश्चिम, मुंबई-४०००४३ चा सर्व खंड आणि भूखंड. उत्तरेसः रोड, दक्षिणेसः खुली जागा, पूर्वेसः मंगलमूर्ती कॉम्प्लेक्स पश्चिमः सी विंग.
सही/—
दिनांकः १४.०६.२०२२ मुख्य व्यवस्थापक प्राधिकृत अधिकारी
ठिकाणः मुंबई बँक ऑफ बडोदा

सोनिया गांधी रुग्णालयातून घरी

नवी दिल्ली : येथील सर गंगाराम रुग्णालयात दाखल करण्यात आलेल्या काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी यांच्या प्रकृतीत सुधारणा झाल्याने त्यांना सोमवारी सायंकाळी घरी पाठविण्यात आले. त्यांना डॉक्टरांनी विश्रांतीचा सल्ला दिला आहे, असे पक्षातर्फे सांगण्यात आले. करोनापश्चात प्रकृतीच्या गुंतागुंतीमुळे सोनिया यांना १२ जून रोजी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. ७५ वर्षीय सोनिया गांधी यांना सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) नॅशनल हेराल्ड प्रकरणात २३ जून रोजी चौकशीसाठी हजर होण्यास सांगितले आहे.

काश्मीरमध्ये सात दहशतवादी ठार

श्रीनगर : जम्मू-काश्मीरमधील कुपवाडा, कुलगाम आणि पुलवामा जिल्ह्यात सोमवारी सुरक्षा दल-पोलीस आणि दहशतवादी यांच्यात झालेल्या चकमकीत सात दहशतवादी ठार झाले. या दहशतवाद्यांमध्ये दोन पाकिस्तानी नागरिकांचा समावेश आहे. जम्मू-काश्मीर पोलिसांनी सांगितले की, पुलवामा जिल्ह्यातील चाटपोरा येथे पोलिसांनी एका दहशतवाद्याला ठार केले, तर लष्करी जवान आणि दहशतवादी यांच्यात कुपवाडा जिल्ह्यातील लोलाब येथे झालेल्या चकमकीत चार दहशतवाद्यांना ठार करण्यात यश आले. दोन आणखी दहशतवाद्यांना कुलगाम जिल्ह्यात ठार केले.

अमेरिकेत जमावावर गोळीबार; एक ठार

न्यूयॉर्क : न्यूयॉर्क येथील हार्लेम परिसरात सोमवारी जमावावर झालेल्या गोळीबारात एक जण मृत्युमुखी पडला, तर आठ जण जखमी झाले आहेत. न्यूयॉर्क पोलिसांनी सांगितले, की येथील 'एफडीआर ड्राईव्ह'जवळील पदपथावर गोळीबार झाल्याची माहिती मिळाली. घटनास्थळी मध्यरात्री १२ वाजून ४० मिनिटांनी पोलीस पोहोचले असता त्यांना गोळीबारात जखमी झालेले पाच जण आढळले.

मुसेवाला हत्येप्रकरणी तिघांना अटक

नवी दिल्ली : प्रसिद्ध पंजाबी गायक सिद्धू मुसेवाला यांच्या हत्येप्रकरणी दिल्ली पोलिसांच्या विशेष पथकाने तिघांना अटक केली. अधिकाऱ्यांनी सोमवारी सांगितले, की हरियाणातील सोनीपतचा रहिवासी प्रियव्रत ऊर्फ फौजी (२६), झज्जर जिल्ह्यातील कशिश (२४) आणि पंजाबच्या भटिंडाचा रहिवासी केशव कुमार (२९) अशी आरोपींची नावे आहेत. प्रियव्रत हा मुख्य हल्लेखोर आहे.

राष्ट्रपतीपदाच्या उमेदवारासाठी विरोधकांची शोधाशोध

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नवी दिल्ली : राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, नॅशनल कॉन्फरन्सचे प्रमुख फारुक अब्दुल्ला यांच्यानंतर गोपालकृष्ण गांधी यांनी देखील राष्ट्रपती पदाची उमेदवारी नाकारल्याने विरोधकांपुढे पेच निर्माण झाला आहे. सर्वसंमतीने उमेदवार निवडण्यासाठी मंगळवारी विरोधी पक्षांची बैठक होत असून नव्या संभाव्य उमेदवारासाठी शोधाशोध करावी लागणार आहे.

गेल्या आठवड्यात दिल्लीत तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी यांनी १६ विरोधी पक्ष नेत्यांची बैठक बोलावली होती. या बैठकीत शरद पवार यांनी उमेदवारीसाठी नकार दिल्यानंतर फारुक अब्दुल्ला व गोपालकृष्ण गांधी यांचे नाव ममता बॅनर्जी यांनी सुचवले होते. पण, जम्मू-काश्मीरमध्ये मी सक्रिय राहीन, असे सांगत अब्दुल्ला यांनीही राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीच्या रिंगणात उतरण्यास नकार दिला होता. विरोधी पक्षांना महात्मा गांधींचे नातू गोपालकृष्ण गांधी यांच्या होकाराची अपेक्षा होती मात्र, त्यांनीही नकार दिला आहे. गांधींच्या नावावर काही पक्षांचा आक्षेप असल्याचेही सांगितले जाते. २०१७ मध्ये उपराष्ट्रपती पदासाठी गोपालकृष्ण गांधी यांनी व्यंकय्या नायडू यांच्याविरोधात निवडणूक लढवली होती मात्र, त्यांना पराभव सहन करावा लागला. राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत वायएसआर काँग्रेस, तेलंगण राष्ट्र समिती तसेच, बिजू जनता दल या प्रादेशिक पक्षांनी विरोधकांना पाठिंबा दिला तरच विरोधी पक्षांचा सर्वसंमत उमेदवार जिंकू शकतो. विजयाची खात्री नसेल तर पुन्हा पराभव स्वीकारावा लागेल, हेही गांधी यांच्या नकारामागील कारण असल्याचे सांगितले जाते. विरोधी पक्षांच्या मंगळवारी होणाऱ्या बैठकीत ममता बॅनर्जी उपस्थित राहणार नसून तृणमूल काँग्रेसचे महासचिव अभिषेक बॅनर्जी पक्षाचे प्रतिनिधित्व करणार आहे. गेल्या बैठकीत प्रादेशिक पक्षांशी संवाद साधण्याची जबाबदारी शरद पवार व मल्लिकार्जुन खरगे यांच्याकडे सोपवण्यात आली होती व त्यादृष्टीने बिगरभाजप पक्षांशी चर्चाही केली गेली होती.

उमेदवारी अर्ज भरण्याचा २९ जून हा अखेरचा दिवस आहे.

राष्ट्रीय स्तरावर सहमती आणि विरोधकांची एकजूट आवश्यक- गांधी

नवी दिल्ली : पश्चिम बंगालचे माजी राज्यपाल गोपाळकृष्ण गांधी यांनी विरोधी पक्षाच्या संयुक्त आघाडीच्या राष्ट्रपतीपदासाठीच्या उमेदवारीला नकार दिला आहे. या पदासाठीच्या उमेदवाराच्या निवडीबाबत राष्ट्रीय स्तरावर सर्वसहमती आणि विरोधी पक्षांत एकजूट आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. या संदर्भात प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात ७७ वर्षीय गांधी यांनी म्हंटले आहे, की विरोधी पक्षांच्या अनेक नेत्यांनी राष्ट्रपतीपदासाठीच्या आगामी निवडणुकीच्या उमेदवारीसाठी आपल्या नावाचा विचार केला, ही माझ्यासाठी सन्मानजनक बाब आहे. मी त्यांचा आभारी आहे. या प्रस्तावावर खूप विचार केल्यावर मला असे जाणवले, की विरोधी पक्षाचा राष्ट्रपतीपदासाठीचा उमेदवाराच्या नावाबाबत विरोधकांमध्ये एकमत तर हवेच परंतु त्यांच्याबाबत राष्ट्रीय स्तरावरही सर्वसहमती असावी.

'हिटलर' विधानामुळे काँग्रेसने 'सत्याग्रह' गुंडाळला

मोदींशी तुलना मान्य नसल्याचे स्पष्टीकरण

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नवी दिल्ली : काँग्रेसच्या जंतर-मंतरवर झालेल्या सत्याग्रह आंदोलनात सोमवारी माजी केंद्रीय मंत्री सुबोधकांत सहाय यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींची तुलना हिटलरशी केल्याने अस्वस्थता पसरली. काँग्रेसच्या तमाम ज्येष्ठ नेत्यांसमोर सहाय यांनी वादग्रस्त विधान केल्यामुळे माध्यम विभाग प्रमुख जयराम रमेश यांनी सहाय यांच्या विधानाचे तातडीने खंडन केले व सहाय यांच्या मतांपासून काँग्रेसला अलिप्त केले.

राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गेहलोत, सचिन पायलट, अधीर रंजन चौधरी, सलमान खुर्शिद यांच्या उपस्थितीत सहाय यांनी वादग्रस्त विधान केल्याने काँग्रेसमध्ये गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. त्यानंतर जंतर-मंतरवरील सत्याग्रह आंदोलन गुंडाळण्यात आले.

हिटलरने सुद्धा सैन्यदलाअंतर्गत 'खाकी' नावाची संस्था निर्माण केली होती. केंद्रातील भाजप सरकार देखील हिटलरच्या पावलावर पाऊल टाकून चालली आहे, असे सुबोधकांत सहाय म्हणाले. त्यानंतर मोदींना उद्देशून, जी व्यक्ती हिटलरच्या मार्गाने जाईल, तिचा मृत्यू देखील हिटलरप्रमाणे होईल, असे वादग्रस्त विधान सहाय यांनी केले. मात्र 'हिटलर की मौत...' असा जुना वाक्प्रचार असून त्याबद्दल मी बोलत होतो, असे सहाय नंतर म्हणाले.

राहुल गांधी यांना 'ईडी'चे आजही बोलावणे

'नॅशनल हेराल्ड'प्रकरणी काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांची 'ईडी'ने सोमवारी चौथ्यांदा चौकशी केली. गेल्या आठवड्यात सोमवार ते बुधवार या तीन दिवसांमध्ये राहुल यांची ३० तास चौकशी झाली. सोमवारी राहुल गांधी काँग्रेसच्या मुख्यालयात न येता थेट 'ईडी'च्या कार्यालयात दाखल झाले. 'ईडी'ने राहुल यांना मंगळवारीही चौकशीसाठी हजर राहण्यास सांगितले आहे.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र
७०८ सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०.
Email- preservicedept@maa.ac.in
डी.एल.एड प्रथम वर्ष ऑनलाइन प्रवेश सन २०२२-२३ (शासकीय कोटा)
प्रसिद्धी निवेदन
शैक्षणिक वर्ष सन २०२२-२३ साठी डी.एल.एड. प्रथम वर्षाचे प्रवेश ऑनलाइन पद्धतीने करण्यात येत आहे. याबाबतचे वेळापत्रक, ऑनलाइन अर्ज भरण्याबाबतच्या सविस्तर सूचना, प्रवेश नियमावली व अध्यापक विद्यालयाची यादी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्या www.maa.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.
१. दि. २३.०६.२०२२ पासून www.maa.ac.in या संकेतस्थळावर अर्ज भरण्यास सुरुवात होईल.
२. अर्ज भरण्यासाठी उमेदवाराचा स्वतःचा Email ID असणे बंधनकारक आहे.
३. प्रवेश अर्ज शुल्क-खुला संवर्ग रु. २००/-, खुला संवर्ग वगळून अन्य संवर्ग रु. १००/- असे राहील.
४. उमेदवारास एकापेक्षा जास्त माध्यमासाठी अर्ज करावयाचा असेल तर प्रत्येक माध्यमाच्या संवर्गानुसार स्वतंत्र आवेदनपत्र शुल्क भरावे लागेल.
५. प्रवेश अर्ज शुल्क स्वीकारण्याची पद्धती - प्रवेश अर्ज शुल्क ऑनलाइन/ payment gateway/ Ewallet स्वतःचे किंवा नातेवाईकाच्या क्रेडीट कार्ड, डेबिट कार्ड याद्वारेच स्वीकारले जाईल.
६. प्रवेश पात्रता - प्रवेशास इच्छुक असणारे कला, वाणिज्य, विज्ञान व एम.सी.व्ही.सी. शाखेतील पात्र उमेदवार इ. १२ वी खुल्या संवर्गासाठी किमान ४९.५ टक्के गुण व खुला संवर्ग वगळून अन्य संवर्ग संवर्गासाठी किमान ४४.५ टक्के गुणांसह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
७. व्यवस्थापन कोट्यातून प्रवेश घेणाऱ्या उमेदवारांनी ऑनलाइन प्रक्रियेतील अर्ज भरणे बंधनकारक आहे.
८. उमेदवारांना प्रवेश अर्ज भरताना तांत्रिक अडचणी असल्यास अशा अडचणी स्वतःच्या registered ई-मेलवरून support@deledadmission.in या ई-मेलवर पाठवाव्यात.
९. प्रवेशाबाबतचे वेळापत्रक संकेतस्थळावर प्रसिद्ध केले जाईल.
याबाबत वर्तमानपत्रात पुन्हा स्वतंत्र जाहिरात दिली जाणार नाही. त्यासाठी उमेदवाराने वेळोवेळी संकेतस्थळ पाहणे आवश्यक आहे.
दि. १५.०६.२०२२ सही/-
स्थळ-पुणे (एम. डी. सिंह)
संचालक
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे
तथा
अध्यक्ष,
राज्यस्तरीय डी.एल.एड. प्रवेश निवड, निर्णय व प्रवेश संनियंत्रण समिती, पुणे
डीजीआयपीआर-२०२२-२३/५/सी १४१०

महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ, मर्यादित
(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)
दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव (पूर्व), मुंबई-४०००६५
मीडिया मॅनेजर हे पद कंत्राटी तत्त्वाने भरण्याबाबत जाहिरात

१	कार्यालयाचे नाव	महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित. दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव (पू.), मुंबई-४०० ०६५.
२	पदनाम व पदसंख्या	मीडिया मॅनेजर- ०१ पद
३	पदाचे स्वरूप व कालावधी	कंत्राटी पद्धतीने ११ महिने
४	सविस्तर जाहिरात व अर्ज उपलब्धतेचे ठिकाण	www.filmcitymumbai.org व www.maharashtra.gov.in
५	अर्ज पाठविण्याचे ठिकाण	filmcitycao@gmail.com
६	अर्ज स्वीकारण्याचा अंतिम दिनांक	दि. ०१.०७.२०२२ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत.
७	निवड पद्धत	मुलाखतीद्वारे

अर्जाचा नमुना, पदाची अर्हता, अनुभव, अटी-शर्ती यांचा तपशील www.filmcitymumbai.org व www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या विहित नमुन्यातच अर्ज सादर करावा, अन्यथा आपल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. या संदर्भात कोणत्याही उमेदवाराची अंतिम निवड वा उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर नाकारण्याचे पूर्ण अधिकार व्यवस्थापकीय संचालक स्वतःकडे राखून ठेवीत आहे.
स्वाक्षरी/-
व्यवस्थापकीय संचालक,
म.चि.रं. व सां.वि.म. मर्यादित
डीजीआयपीआर-२०२२-२३/५/सी/१४०३

Reliance Industrial Infrastructure Limited
नोंदणीकृत कार्यालय: एन के एम इंटरनॅशनल हाऊस, ५वा मजला, ७८ बॅकबे रिक्लमेशन, एल् आई सी योगक्षेमा बिल्डिंगच्या मागे, बाबुभाई चिनाय मार्ग, मुंबई – ४०० ०२०
दूरध्वनी: +९१-२२-४४७७ ९०५३ • फॅक्स: +९१-२२-४४७७ ९०५२ • ईमेल: investor_relations@riil.in
CIN: L60300MH1988PLC049019
सूचना
(कंपनीच्या इक्विटी भागधारकांसाठी)
विषय: कंपनीच्या इक्विटी समभागांचे गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी प्राधिकरणात हस्तांतरण
गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी प्राधिकरण (लेखा, लेखापरीक्षण, हस्तांतरण आणि परतावा) नियम, २०१६, सुधारणा केलेल्या (''नियम'') मधील तरतुदींनुसार ही सूचना प्रसिद्ध करण्यात येत आहे.
इतर मुद्यांसोबत वरील नियमांमध्ये ज्या भागधारकांच्या लाभांशाचे सलग सात किंवा अधिक वर्ष वितरण होऊ शकलेले नाही किंवा ज्याचा दावा करण्यात आलेला नाही अशा सर्व समभागांचे गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी (''आयईपीएफ'') प्राधिकरणाकडे हस्तांतरण करण्याबाबत तरतूद आहे.
नियमांतील विविध आवश्यकतांचे पालन करताना कंपनीने आर्थिक वर्ष २०१३-१४ किंवा तत्पूर्वीच्या ओळीने सात किंवा अधिक वर्षांच्या कालावधीसाठी लाभांशाचे पैसे न देण्यात आलेल्या किंवा दावा न केलेल्या सर्व समभागांचे त्यांच्या संबंधित देय तारखांना आयईपीएफ प्राधिकाऱ्यांकडे हस्तांतरण केले आहे. कंपनीने, आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये आयईपीएफ प्राधिकाऱ्यांकडे हस्तांतरित करण्यात येणाऱ्या समभागांच्या संबंधित, योग्य कार्यवाही करण्यासाठी, दिनांक १६ जून, २०२२ च्या पत्राद्वारे व्यक्तिगतरित्या संबंधित भागधारकांना कळविले आहे.
कंपनीने आपल्या वेबसाईटवर www.riil.in आयईपीएफ प्राधिकरणामध्ये हस्तांतरित होण्यास पात्र असलेल्या समभागांचा व सदर भागधारकांचा तपशिल उपलब्ध केला आहे. भागधारकांना http://www.riil.in/transfer_suspense_accountiepf.html ही वेब-लिंक पाहण्याची आणि त्यामधील न मिळालेल्या लाभांशाच्या तपशिलाची व आयईपीएफ प्राधिकरणात हस्तांतरित होण्यास पात्र समभागांची पडताळणी करण्याची विनंती करण्यात येत आहे.
भागधारकांनी याची नोंद घ्यावी की नियमांनुसार कार्यवाही पूर्ण करून, भागधारक दावा न केलेला लाभांश व समभाग, दोन्ही जे आयईपीएफ प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्यात आलेले आहेत, सदर समभागांवर जमा सर्व लाभांसह, काही असल्यास, आयईपीएफ प्राधिकरणाकडे पुन्हा दावा करू शकतील.
प्रत्यक्ष स्वरूपात समभाग धारण करणारे आणि ज्यांचे समभाग आयईपीएफ प्राधिकरणामध्ये हस्तांतरित होण्यास पात्र आहेत अशा संबंधित भागधारकांनी कृपया याची नोंद घ्यावी की, त्यांच्याशाशी असलेल्या मूळ समभाग प्रमाणपत्राऐवजी नियमानुसार डिमटिरिअलाईज करण्यासाठी आणि आयईपीएफ प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्यासाठी कंपनी सदर समभाग प्रमाणपत्रांची नविन प्रत जारी करेल आणि अशा प्रकारे सदर प्रमाणपत्र जारी केल्यानंतर, त्यांच्या नावे नोंदणी करण्यात आलेले मूळ समभाग प्रमाणपत्र आपोआप रद्द होईल आणि त्याद्वारे कोणताही व्यवहार करता येणार नाही. भागधारकांनी ह्याची देखील नोंद घ्यावी की, कंपनीच्या वेबसाईटवर कंपनीने उपलब्ध केलेला भागधारकांचा तपशिल हा ह्या नियमांतर्गत आयईपीएफ प्राधिकरणाकडे समभाग हस्तांतरित करण्यासाठी कंपनीद्वारा जारी करण्यात येणाऱ्या समभाग प्रमाणपत्रांच्या नविन प्रतींसाठीची योग्य सूचना आहे.
कंपनीला संबंधित भागधारकाकडून १६ ऑक्टोबर, २०२२ रोजी किंवा तत्पुर्वी कोणतेही उत्तर (दावा न केलेल्या/वसूल न केलेल्या लाभांशाचा दावा करण्यासंदर्भात) न मिळाल्यास, नियमांमध्ये निश्चित करण्यात आलेल्या पद्धतींनुसार कॉर्पोरेट कार्यवाहीद्वारे कंपनी नियमांमध्ये निश्चित करण्यात आलेल्या आवश्यकतांची पूर्तता करण्यासाठी समभाग डिमटिरिअलाईजकरून ते आयईपीएफ प्राधिकाऱ्यांकडे हस्तांतरित करेल.
भागधारकांना या संदर्भात आणि नियमांविषयी काही शंका असल्यास, त्यानी श्री. एस्. पी. वेणुगोपाल, उपाध्यक्ष, केफिन टेक्नॉलॉजीस् लिमिटेड, कंपनीचे शेअर ट्रान्सफर एजंट्स यांच्याशी पत्ता: सेलेनियम टॉवर बी, प्लॉट नं. ३१-३२, गचीबोवली, फायनानशियल डिस्ट्रीक्ट, नानक्रमगुडा, हैद्राबाद – ५०० ०३२, दूरध्वनी: + ९१-४०-६७१६ १७०८, फॅक्स: + ९१-४०-६७१६ १६८०, टोल फ्री क्र: १८००-३०९-८९९८ (सर्व कामकाजाच्या दिवशी सकाळी ९.०० ते सायंकाळी ६.००), ई-मेल: riilnkm@kfintech.com, वेबसाईट: www.kfintech.com येथे संपर्क साधावा.
रिलायन्स इंडस्ट्रियल इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड करिता
सही/-
स्थळ : मुंबई शैलेश ढोलकिया
दिनांक : २० जून, २०२२ कंपनी सचिव आणि कंप्लायन्स ऑफिसर
www.riil.in

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ
म्हाडा MHADA
(म्हाडा घटक)
कार्यकारी अभियंता (फ/उ विभाग) यांचे कार्यालय, "सोनावाला" इमारत दादर (पूर्व), मुंबई ४०० ०१४
वेबसाईट : https://mhada.maharashtra.gov.in ईमेल : rreefnmhada@gmail.com
ई-निविदा सूचना
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत कार्यकारी अभियंता फ (उत्तर) विभागातील खालील कामाकरिता योग्य वर्गामध्ये नोंदणी केलेल्या उप जिल्हानिबंधक/